# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**परिपत्रक क्र. ०४/२०२३**

सर्व संबंधितांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, जी-२० परिषदेच्या पार्श्वभूमिवर विद्यापीठ आवारात कोठेंही अनुचित प्रकार घडू नये म्हणून सुरक्षेच्या दृष्टीकोणातून विद्यापीठाचे मुख्य प्रवेशद्वार (पुना गेट), जनरल जोशी प्रवेशद्वार (खडकी गेट) व आयुका संस्थेशेजारील प्रवेशद्वार (आयुका गेट) येथे योग्य तो सुरक्षा बंदोबस्त तैनात करण्यात आलेला आहे.

या तिन्हीं प्रवेशद्वारांवरुन विचारपूस करुन व तपासणी करुन विद्यापीठाशी संबंधीत असणाऱ्यांनाच प्रवेश दिला जाईल. विद्यापीठाशी संबंधीत नसणाऱ्या व्यक्तींना प्रवेश दिला जाणार नाही. त्यामुळे विद्यापीठाचे शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, अधिकारी, विद्यार्थी-विद्यार्थीनीं यांनी विद्यापीठ ओळखपत्र स्वतः जवळ बाळगावे व ते प्रवेशद्वारावर दाखवून प्रवेश करावा. विद्यापीठ ओळखपत्राशिवाय विद्यापीठ आवारात प्रवेश दिला जाणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

कृपया सुरक्षा विभागाचे अधिकारी, कर्मचारी यांना या विचारपूस व तपासणीकामी सहकार्य करावे.

कळावे,

**(डॉ.प्रफुल्ल पवार)**
**कुलसचिव**

**गणेशखिंड, पुणे : ४११ ००७.**
**जावक क्र. सु.वि./२०/२०२३,**
**दिनांक :- १३/०१/२०२३**

**<u>प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-</u>**

०१. मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, } सदर परिपत्रक सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावे ही
०२. मा. शाखाप्रमुख, सर्व प्रशासकीय विभाग } विनंती.

०३. मा. व्यवस्थापक, आय.टी. सेल - कृपया सदर परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.